भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०९/२०१७

## १) संगनमत करुन ग्राहकांचा विश्वासघात करुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–

एप्रील २०१७ ते ११/०८/२०१७ पर्यत. यातील आरोपीतांनी संगनमत करुन आस्था फायनान्स सिर्व्हीसेस फायनान्स कंपनी भंडारा येथे उघडुन एजंट नेमुन ग्राहकाकडुन जमा केलेल्या रजीस्ट्रेशन फिस व ग्राहकांकडुन कोर्ट फिस, रजीस्ट्रेशन फिस, सर्वे फिस, या नावाने रक्कम आकारुन एकुण ४८ ग्राहकाकडुन एकुण ८,७७,१४०/–रु. जमा केली व यातील २६,३००/–रु. एजन्टनी पेट्रोल व कमीशनवर खर्च केले असुन उर्वरीत एकुण ८,५०,८४०/–रु. ग्राहकांना लोन न देता त्याचे कडुन तारण म्हणुन घेतलेले कागदपत्रे सोबत घेवुन जावुन कार्यालय बंद करुन पळुन गेले व ग्राहकांचे एकुण ८,७७,१४०/–रु. विश्वासघात करुन फसवणुक केल्याने चौकशी अहवाला वरुन सरतर्फे पोउपनी. चेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२०,४०६,४०८,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

## २) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०६/०९/२०१७ चे १०.३५ ते १०.४५ वा. दर. यातील फिर्यादी हे त्याचे शाळेतील मुलांची प्रार्थना घेत असतांना फिर्यादीला बरे वाटत नसल्याने शाळेचे वऱ्हांडयात उभे असता यातील आरोपी हा शाळेत येवुन माझे विरोधात शिक्षणाधिकारी यांचे कडे तक्रार का दिली म्हणुन भांडण करुन फिर्यादीस तु तोफ झालास का असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तु वऱ्हांडयातुन खाली ये असे बोलुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी अनमोल अरुणजी गजभिये वय ५५ वर्ष, रा. समर्थ नगर/मुरमाडी लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

## ४) मोटार सायकल हयगयीने चालवुन महिलेला धडक देवुन जखमी करुन औषधोपचारा दरम्यान मृत्यु :–

दिनांक २१/०८/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील मृतक श्रीमती तुळजाबाई पांडुरंग नागपुरे वय ७० वर्ष, रा. कुर्झा ही नातु खुशाल रमेश नाले याचे मोटार सायकल वर नागभीड वरुन भुयार गावाजवळ थांबुन बाथरुम ला जात असता यातील आरोपी वाहण चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व भरधाव वेगाने चालवुन मृतकला धडक मारुन जखमी केल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेला व मृतकास औषधोपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे प्राप्त कागदपत्रावरुन पो. स्टे. ला सरतर्फे फिर्यादी मपोना. चिखले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३०४(अ)भादंवि. सहकलम १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डहाके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**५) ट्रान्सफार्मरमधील विद्युत आईलची चोरी . :—**

दिनांक ०३/०९/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील स्थापीत कोसरा विद्युत वितरण केन्द्राचे विद्युत ट्रान्सफार्मर मधील १९० लिटर ऑईल किंमती १६,०००/—रु. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी तुळशिदास ज्ञानेश्वर पिल्लेवान वय ३७ वर्ष, रा. पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**६) विष प्राषण करुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०५/०९/२०१७ चे ००.४५ वा. दर. यातील मृतक जयदेव सखाराम मेश्राम वय ५५ वर्ष, रा. कोदुर्ली याने त्याचे शेतात कोणतेतरी विष प्राषण केल्याने त्यास औषधोपचाराकरीता सा. रु भंडारा येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक ०५/०९/२०१७ चे ००.४५ वा. मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे प्राप्त कागदपत्र टापालाव्दारे प्राप्त झाल्याने पो. स्टे. ला सरतर्फे फिर्यादी मपोना. चिखले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. रहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**७) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक ०६/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे जवाहरनगर, वरठी, व पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून २५ लिटर हा.भ. दारू किंमती १३००/—रु. व ०३ लिटर ६०० मिली लिटर देशी दारु किंमती १०४०/—रु. तसेच जुगारातुन किंमती १०४५८० /—रु. चा असा एकुण किंमती १०६९२०/—रु. माल जप्त करण्यात आला आहे.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०६/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.